## महाराष्ट्र शासन

समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३ चर्चरोड, पुणे-४११००१
दुरध्वनी क्रमांक २६१२०५६०/२६१२६३०७-२० ईमेल-sakalyanpunenahas@gmail.com

जा.क्र.सकआ/शिक्षण/संविधान दिन-२६ नोव्हेंबर/२०२३-२४/का-५अ /५९८८ दि. : २४ नोव्हेंबर,२०२३

प्रति,

१. जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व)
२. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व)

**विषय :-** दिनांक - २६ नोव्हेंबर **"संविधान दिन"** म्हणून साजरा करणेबाबत

**संदर्भ :** १) सामान्य प्रशासन विभाग याचे शासन निर्णय दि. २४ नोव्हेंबर, २००८.
२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे शासन निर्णय दि. ०४ नोव्हें. २०१३ .
३) राज्य महासचिव, नॅशनल दलित मूव्हमेंट फॉर जस्टीस,कल्याण(वेस्ट), ठाणे यांचे निवेदन दि.२३.११.२०२३.

भारतीय संविधानाबाबत राज्यामध्ये जनजागृती व्हावी या दृष्टीने दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस **"संविधान दिन"** म्हणून साजरा करण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग यांचे संदर्भ क्र. १ व २ शासन निर्णय व परिपत्रक यामध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करण्याबाबत खालील प्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

१) राज्यात सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायती, महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये संविधानाच्या उद्देशिकाचे सामुहिक वाचन करण्यात यावे.

२) संविधानबाबत जनजागृती व्हावी म्हणून सर्व शाळा, महाविद्यालयामार्फत त्या दिवशी "संविधान यात्रा" काढण्यात यावी व त्यामध्ये संविधानाची उद्देशिका, मूलभूत हक्क, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इत्यादी संविधानातील महत्वाची कलमे ठळकरित्या दिसतील असे बॅनर्स, पोस्टर्स वापरावेत.

३) याबाबत शाळा, महाविद्यालयांमध्ये निबंध/भित्तीपत्रके/सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

Scanned with OKEN Scanner

४) शासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत संविधानाबाबत जनजागृती करणारी व्याख्याने, कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत.

संदर्भ क्र. ३ राज्य महासचिव, नॅशनल दलित मूव्हमेंट फॉर जस्टीस,कल्याण(वेस्ट), ठाणे यांनी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा करण्याचे सर्व विभागांना संविधान दिन साजरा करणेबाबत पत्र दिले आहे.

तरी दिनांक २६ नोव्हेंबर **"संविधान दिन"** साजरा करण्याच्या अनुषंगाने भारतीय संविधानातील नागरिकांच्या मुलभुत कर्तव्याच्या जागरुकतेसाठी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करण्याबाबत आपल्या जिल्ह्यातील अधिनस्त सर्व कार्यालयांना निर्देश देण्यात यावे.

24.11.23

(ओम प्रकाश बकोरिया)
**आयुक्त**
समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत – माहितीस्तव सविनय सादर.

१) मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभा, मंत्रालय, मुंबई.
२) मा. विभागीय आयुक्त, (सर्व).

प्रत : कार्यवाहीस्तव

१) प्रादेशिक उपआयुक्त, समाज कल्याण विभाग (सर्व)
२) सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण (सर्व)
३) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

/- आपणांस सूचित करण्यात येते की, आपण स्वत: मा. जिल्हाधिकारी यांचेशी प्रत्यक्ष संपर्क साधून आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयामध्ये २६ नोव्हेंबर "संविधान दिन" साजरा केल्याबाबत अहवाल सादर करावा.

प्रत : माहितीस्तव.

राज्य महासचिव, नॅशनल दलित मूव्हमेंट फॉर जस्टीस,कल्याण(वेस्ट), ठाणे.

Scanned with OKEN Scanner

NCDHR - N D M J

# National Dalit Movement for Justice (NDMJ)

National Secretariat
7/58, 1st Floor, South Patel Nagar,
New Delhi-110 008
Tel +91 11 45 0093 09

State Secretariat
Flat No.702, 7th Floor, B-Wing,
Saileela Bld, Wadhwa Hights, Godrej Hills,
Kadakpada , Kalyan (w), Dist. - Thane 421 301

दिनांक 23/11/2023

मा. ~~सहाय्यक~~ आयुक्तसो,
समाजकल्याण, पुणे

विषय :- 26 नोव्हेंबर 2023 हा दिवस संविधान दिन साजरा करण्याचे सर्व विभागांना आदेश देऊन जो विभाग संविधान दिन साजरा करणार नाही त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांना निलंबित करणेबाबत...

महोदय,

वरील विषयास अनुसरून निवेदन सादर करतो की,महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक 24 नोव्हेंबर 2008 च्या शासननिर्णयानुसार भारतीय संविधानाबाबत जनजागृती आणि सर्व नागरीकांना संविधानाची ओळख व्हावी.याकरिता राज्यात दरवर्षी दिनांक 26 नोव्हेंबर हा दिवस संविधान दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये जिल्हा परिषद पंचायत समित्या,नगरपालिका,महानगर पालिका,ग्रामपंचायती महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये संविधान दिवस पुढीलप्रमाणे साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.सर्व शासकीय निमशासकीय विभागांमध्ये संविधानाच्या प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात यावे. संविधानाबाबत जनजागृती व्हावी म्हणून सर्व शाळा महाविद्यालयांमार्फत त्या दिवशी संविधान यात्रा काढण्यात यावी.व त्यामध्ये संविधानाची प्रास्ताविका मूलभूत हक्क,कर्तव्य,व जबाबदाऱ्या, इत्यादी संविधानातील महत्वाची कलमे ठळक रित्या दिसतील असे बॅनर, पोस्टर वापरावेत.

निरीक्षण

याबाबत शाळा महाविद्यालयांमध्ये निबंध/भित्तीपत्रके/सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.शासकीय कार्यालये,स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत संविधानाबाबत जनजागृती करणारी व्याख्याने,कार्यक्रम आयोजित करावेत.संपूर्ण कार्यक्रमाचा वस्तुनिष्ठ अहवाल व्हिडिओ शूटिंग,फोटो,

5 डिसेंबर पर्यंत जिल्हाधिकारी यांच्या मार्फत शासनास पाठवावा.

Scanned with OKEN Scanner

NCDHR - N D M J

# National Dalit Movement for Justice (NDMJ)

National Secretariat

7/58, 1st Floor, South Patel Nagar,

New Delhi-110 008

Tel + 91 11 45 0093 09

State Secretariat

Flat No.702, 7th Floor, B-Wing,

Saileela Bld, Wadhwa Hights, Godrej Hills,

Kadakpada, Kalyan (w), Dist. - Thane 421 301.

सर्व जिल्हाधिकारी यांनी संविधान दीन साजरा केल्याचा अहवाल त्यांच्या अंतर्गत असणाऱ्या सर्व विभागांचा वस्तूनिष्ठ अहवाल घेण्यात यावा. अनेक शासकीय निमशासकीय कार्यालयीन प्रमुख,महाविद्यालयांचे प्राचार्य,शाळांचे मुख्याध्यापक, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण अधकारी 26 नोव्हेंबर दिनी कार्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा ठेवून संविधान दिन साजरा करीत नाहीत.शासनाच्या आदेशानुसार संविधान दिन साजरा करीत नाहीत.

26 नोव्हेंबर 2023 हा दिवस रविवारी आहे त्यामूळे अनेक कार्यालयीन प्रमुख जाणून बुजून रविवारी 26 नोव्हेंबर दीन साजरा करणार नाहीत. याच्यावर जिल्हाधिकारी,तहसीलदार, प्रांताधिकारी, यांनी व्यवस्थित लक्ष द्यावे.अशा कार्यालयीन प्रमुखांना बडतर्फ करण्याची कारवाई करण्यात यावी.सर्व विभागांचा वस्तुनिष्ठ अहवाल संविधान दिन साजरा केल्याचा व्हिडीओ चित्रीकरण करावे म्हणून आदेश देण्यात यावेत.

ज्या शाळा महाविद्यालयांमध्ये, आश्रम शाळांमध्ये संविधान यात्रा प्रभात फेरी काढणार नाहीत त्यांची मान्यता रद्द करावी.शासकीय अधिकाऱ्यांनी कसुरी केल्यास देशद्रोही समजून सेवेतून बडतर्फ करावे.यामध्ये कसुरी केल्यास संघटनेच्या माध्यमातून जे कार्यालयीन प्रमुख संविधान दिन साजरा करणार नाहीत अशांच्या तोंडाला काळे फासण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासु

वैभव तानाजी गिते

राज्य सचिव

नॅशनल दलित मूव्हमेंट फॉर जस्टीस

पंचशीला कुंभरकर

राज्य महिला संघटक

भवनाथ ओगवन

सामाजिक कार्यकर्ते

NDMJ

Scanned with OKEN Scanner

राज्यातील सर्व शाळांमधून भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
क्रमांक-संकीर्ण-२०१२/(४५८/१२)/प्राशि-५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक - ४ फेब्रुवारी, २०१३.

शासनाचे आभारी
आहोत.
5/3/2013

वाचा :- सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.जपुती-२२०८/१३३८/प्र.क्र.१०९/०८/२९,
दि. २४ नोव्हेंबर, २००८.

प्रस्तावना :

भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता प्राप्त करून देण्याची आणि सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करणारे भारताचे संविधान दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी अंगीकृत आणि अधिनियमित करून देशाला अर्पण करण्यात आले. हे संविधान दिनांक २६ जानेवारी, १९५० पासून अमलात आले असले तरी भारतीय संविधानाची माहिती अजूनही बहुतेक नागरिकांना नाही. भारतीय संविधानातील मौलिक तत्त्वे, संवैधानिक हक्क आणि कर्तव्ये स्वतंत्र भारताच्या नागरिकांना संस्कारित करणारी आहेत. ही तत्त्वे शालेय जीवनात विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविणे आणि त्यांना जागरूक नागरिक बनविणे याकरिता संविधानातील तत्त्वांचा प्रसार व प्रचार करणे आवश्यक असल्यामुळे शालेय जीवनापासूनच विद्यार्थ्यांना संविधानाची पुरेशी ओळख व जागृती करून देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासूनच भारतीय संविधानाची पुरेशी ओळख व्हावी म्हणून राज्यातील सर्व प्रकारच्या, सर्व माध्यमांच्या सर्व शाळांमधून (राज्य मंडळ व इतर मंडळांशी सल्लग्न) परिपाठाच्या/प्रार्थनेच्या वेळी संविधानाच्या प्रास्ताविकेचे (Preamble) दररोज वाचन करण्यात यावे. राज्यातील सर्व शाळांच्या दर्शनी भागात संविधानाची प्रास्ताविका लावावी अथवा भिंतीवर लिहावी किंवा कायमस्वरुपी फलक लावावा. शाळेतील विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व पालकांना संविधानाची माहिती व्हावी यासाठी संविधान यात्रा, संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा, चित्रकला, निबंध, स्लोगन, पोस्टर्स, समूहगान इ. स्पर्धांचे आयोजन करावे. शाळांमध्ये तज्ज्ञांची व्याख्याने तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन वेळोवेळी करण्यात यावे. तसेच शाळांमध्ये व गावांमध्ये संविधान सभा भरविण्यात याव्यात जेणेकरून विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना

D:\Sardar-२०१२\Sanvidhan-२०१२.Docx



Scanned with OKEN Scanner

संविधानावावत माहिती होईल. शाळेतील प्रत्येक कार्यक्रमाची/समारंभाची सुरुवात प्रास्ताविकेच्या सामूहिक वाचनाने करण्यात यावी.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१३०१२९१२१७०५७२२१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(ज. स. सहारिया)
अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
२) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
३) सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव,
४) सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मा. मुख्य सचिव यांचे उप सचिव,
६) मा. अपर मुख्य सचिव/मा. प्रधान सचिव/मा.सचिव, मंत्रालयीन सर्व विभाग,
७) मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई,
८) सर्व विभागीय आयुक्त,
९) सर्व जिल्हाधिकारी,
१०) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.),
११) सर्व आयुक्त, महानगरपालिका,
१२) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्यापरिषद), पुणे,
१३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१४) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१५) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
१६) सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक),
१७) सर्व प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
१८) शिक्षण निरीक्षक (दक्षिण/पश्चिम/उत्तर), मुंबई विभाग,
१९) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०) निवडनस्ती -- प्राशि-५.



Scanned with OKEN Scanner

भारतीय संविधानाबाबत जनजागृती आणि सर्व नागरिकांना संविधानाची ओळख व्हावी या करीता राज्यात दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान दिवस" म्हणून साजरा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक, जपुती २२०८/१३३८/प्र.क्र.१०९/०८/२९
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :२४ नोव्हेंबर, २००८

**प्रस्तावना :-**

भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व सर्व नागरिकांस सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यांचे स्वातंत्र्य व समानता प्राप्त करून देण्याच्या अनुषंगाने दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी भारताची स्वतंत्र राज्य घटना अंगिकृत आणि अधिनियमित करून स्वतःप्रत अर्पण केलेली आहे. सदर राज्य घटना ही दिनांक २६ जानेवारी, १९५० पासून अंमलात आली तरी भारतीय संविधानाची माहिती अजूनही देशाच्या बहुतेक नागरिकांना तसेच संविधानानुसार काम करणाऱ्या सर्व यंत्रणेतील अधिकारी/कर्मचारी यांनाही नाही. त्यामुळे या संविधानाने शासकिय, न्यायीक इत्यादी सारख्या यंत्रणा निर्माण झाल्या त्या संविधानाची ओळख सर्वांना करून देण्याच्या अनुषंगाने राज्यात दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस **"संविधान दिवस"** साजरा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय :-**

याप्रकरणी शासनाने साकल्याने विचार करून राज्यामध्ये संविधानाबाबत जनजागृती व्हावी यादृष्टिने **दरवर्षी दिनांक २६ नोव्हेंबर हा दिवस "संविधान दिवस"** म्हणून राज्यात सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, जिल्हापरिषदा, पंचायतसमित्या, महानगरपालिका, नगरपालिका ग्रामपंचायती, महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये, पुढीलप्रमाणे साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

१) राज्यात सर्व शासकीय व निमशासकीय कार्यालये, जिल्हापरिषदा, पंचायतसमित्या, महानगरपालिका, नगरपालिका ग्रामपंचायती, महाराष्ट्रातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा व महाविद्यालयांमध्ये संविधानाच्या प्रास्ताविकेचे (Preamble) (परिशिष्ट-१ पहावे) सामुहिक वाचन करण्यात यावे.

२) संविधानाबाबत जनजागृती व्हावी म्हणून सर्व शाळा, महाविद्यालयामार्फत त्या दिवशी "संविधान यात्रा" काढण्यात यावी व त्यामध्ये संविधानाची प्रास्ताविका, मूलभूत हक्क, कर्तव्ये व जबाबदाऱ्या इत्यादी संविधानातील महत्वाची कलमे ठळकरित्या दिसतील असे बॅनर्स, पोस्टर्स वापरावेत.

३) याबाबत शाळा, महाविद्यालयांमध्ये निबंध/भित्तीपत्रके/सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.

४). शासकिय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत संविधानाबाबत जनजागृती करणारी व्याख्याने, कार्यक्रम आयोजित करण्यात यावेत इत्यादी.



CamScanner
Scanned with OKEN Scanner

शासन पुढे असेही आदेश देत आहे की, उपरोक्त कार्यक्रम साजरा करण्याकरीता येणारा खर्च संबंधीत प्रशासकिय विभागाने/कार्यालयाने हा त्यांच्या कार्यालयीन खर्चातून किंवा अशाच तऱ्हेच्या उद्दिष्टांसाठी असलेल्या तरतुदीतून भागवावा.

शासन पुढे असेही आदेश देत आहे की, प्रत्येक कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयात वरील प्रमाणे "संविधान दिवस" साजरा करण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य शासनास दिनांक ५ डिसेंबर पर्यंत जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

टी. एफ. थेक्केकरा

(टी.एफ. थेक्केकरा)

शासनाच्या प्रधान सचिव.

प्रति, :

- मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
- मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/खाजगी सचिव,
- मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव/खाजगी सचिव,
- मा. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वियं सहाय्यक
- मा. मुख्य सचिव सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय, मुंबई.
- मा.प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई/नागपूर व औरंगाबाद खंडपिठ.
- सर्व मा. अपर मुख्य सचिव, /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय मुंबई.
- मा. कुलपती, राज्यातील सर्व विद्यापिठे.
- प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त, महाराष्ट्र राज्य मुंबई.
- सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
- सचिव, राज्य माहिती आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
- सचिव, राज्य मानवाधिकार आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
- महालेखापाल-१, महाराष्ट्र, मुंबई
- महालेखापाल-२ महाराष्ट्र, नागपूर.
- अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
- सर्व मंत्रालयीन विभाग **(सदर शासन निर्णयाच्या प्रती आवश्यक कार्यवाहीस्तव आजच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुखांना फॅक्सद्वारे पाठवीण्याच्या विनंतीसह).**
- सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
- महासंचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.(आवश्यक ती प्रसिध्दी देण्यासाठी)
- सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी **(सदर शासन निर्णयाच्या प्रती आवश्यक कार्यवाहीस्तव आजच त्यांच्या विभागातील/जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुखांना फॅक्सद्वारे पाठवीण्याच्या विनंतीसह).**
- सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
- सर्व आयुक्त महानगर पालिका
- विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग, नवी दिल्ली.
- सार्वजनिक बांधकाम विभाग, (प्रशा- ४ ) मंत्रालय मुंबई
- निवड नस्ती.




Scanned with OKEN Scanner

# Government of India formally notifies November 26 as Constitution Day

November 26 which is celebrated by those related to Indian legal field as 'Law Day' has been notified by the Government of India as 'Constitution Day'. As is known, the Constitution of India was adopted by the Constituent Assembly on November 26, 1949 and was enforced two months later on January 26, 1950.

The gazette notification to this effect has been issued on November 19, 2015 by the Department of Social Justice and Empowerment of the Ministry Of Social Justice And Empowerment. The notification notes that the current year is also witnessing the 125th birth anniversary of Dr. BR Ambedkar who had chaired the Constituent Assembly and played a pivotal role in the drafting of the Constitution of India.



Earlier on September 30, 2015, a commemorative stamp on Dr. BR Ambedkar was released jointly by Government of India as a part of the celebrations of his of 125th Birth Anniversary.

The 'National Committee on Nationwide Celebration of 125th Birth Anniversary of Dr. B.R. Ambedkar' chaired by the Prime Minister Narendra Modi had its first meeting on July 23, 2015. Government has said that the objective of year-long celebrations is to make the world aware about the life and the work of Dr. BR Ambedkar as a champion of the underprivileged

## *Gazette Notification:*

MINISTRY OF SOCIAL JUSTICE AND EMPOWERMENT

(Department of Social Justice and Empowerment)

NOTIFICATION

New Delhi, the 19th November, 2015

F. No. 19022/11/2015-VI (E).— Whereas the people of India, having solemnly resolved to secure to all its citizens Justice, Liberty, Equality and to promote Fraternity among all, adopted, enacted and gave to themselves the Constitution of India in the Constituent Assembly on the 26th day of November, 1949 ;

And whereas the Drafting Committee of the Constituent Assembly, under the Chairmanship of Dr. B.R. Ambedkar, provided its invaluable services in drafting the Constitution of India and the nation is celebrating the One Hundred and Twenty-fifth Birth Anniversary of Dr. B.R. Ambedkar in recognition of his contribution to building modern India;

Now, therefore, the Government of India has decided to celebrate the 26th day of the November of every year as the "CONSTITUTION DAY" to promote constitutional values among citizens.

B.L. MEENA, Jt. Secy.



CS CamScanner
Scanned with OKEN Scanner